# सरळसेवा भरती

**बेस्ट उपक्रमात बसचालक या पदाकरीता अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग व खुल्या प्रवर्गातील पात्र उमेदवारांकडून ऑन लाईन (Online) पध्दतीने विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. पोस्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.**

बस चालक पदाच्या अनुशेष/रिक्त पदांची संख्या : अनुसूचित जाती-३६, अनुसूचित जमाती-५९३, विशेष मागास प्रवर्ग-१३, इतर मागासवर्ग - १९७ व खुला प्रवर्ग-१२२.

## समांतर आरक्षण

| अनुशेषाचा प्रवर्ग | एकूण रिक्त पदे | खेळाडू | प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|
| टक्केवारी | - | ५% | ५% | - |
| अनु. जाती | ३६ | ०२ | ०२ | ३२ |
| अनु. जमाती | ५९३ | २९ | २९ | ५३५ |
| विशेष मागास प्रवर्ग | १३ | ०१ | ०१ | ११ |
| इतर मागास वर्ग | १९७ | १० | १० | १७७ |
| खुला | १२२ | ०६ | ०६ | ११० |
| एकूण | ९६१ | ४८ | ४८ | ८६५ |

उपरोक्त पदासाठी विहित असलेली वेतन श्रेणी व भत्ते, शैक्षणिक व इतर अर्हता, अनुभव, शारिरीक पात्रता तसेच वयोमर्यादा इत्यादीचा तपशिल पुढील प्रमाणे :-

१) वेतनश्रेणी व भत्ता - मूळ वेतन रुपये ६३०५/- + महागाई भत्ता रुपये ८३८६/- + घरभाडे भत्ता रुपये १८९२/- + वैद्यकीय भत्ता रुपये ५००/- तसेच, रजेचे रोखीत रुपांतर, रजा प्रवास भत्ता, गणवेश धुलाई भत्ता (एकंदरीत अंदाजीत वेतन रुपये १७०८०/-) आणि बेस्ट उपक्रमाच्या बस मधून मोफत प्रवास सुविधा.

२) शैक्षणिक व इतर अर्हता - १) इयत्ता सातवी उत्तीर्ण
२) प्रादेशिक परिवहन प्राधिकरण (R.T.A.) महाराष्ट्र राज्य यांनी दिलेला व नूतनीकरण केलेला अवजड वाहन चालन निर्दोष परवाना व सार्वजनिक वाहन चालन बिल्ला (PSV Badge)

आवश्यक. महाराष्ट्र राज्याबाहेरील इतर राज्यांच्या प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून देण्यात आलेल्या वाहन चालन परवान्यावर महाराष्ट्र राज्यातील प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून अवजड वाहन चालन क्रमांक तसेच, सार्वजनिक वाहन चालन बिल्ला क्रमांकाची नोंद करुन घेणे अनिवार्य असेल.

३) मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) <u>वयोमर्यादा (दिनांक ०१.११.२०१६ रोजी)</u> – खुल्या प्रवर्गासाठी - २१ वर्षे पूर्ण व ३८ पेक्षा जास्त नसावे. राखीव प्रवर्गासाठी- २१ वर्षे पूर्ण व ४३ पेक्षा जास्त नसावे.अत्युच्च गुणवत्ता धारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून कमाल वयोमर्यादा ५ वर्षांपर्यंत शिथिलक्षम करण्यात येईल. प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे इतकी राहिल.माजी सैनिकांसाठी विहित वयोमर्यादेतील सूट ही सदर उमेदवारांच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवे इतका कालावधी अधिक तीन वर्षे इतकी राहिल.

४) <u>शारिरीक पात्रता</u> - उंची-किमान १५६ सें.मी. व कमाल १८२ सें.मी.
वजन- किमान ४५ किलो

५) <u>अनुभव</u> - अवजड वाहन चालन परवाना प्राप्त झाल्याच्या पृष्ठांकित केलेल्या दिनांकापासून किमान ६ महिन्यांचा अवजड वाहन चालविण्याचा अनुभव असणे आवश्यक आहे.

६) <u>खेळाडूंसाठी</u> - खेळाडूंसाठी आरक्षित पदांकरीता खेळाडू उमेदवारांना अर्ज करावयाचा असल्यास उपरोक्त नमूद अर्हता पूर्ण करत असल्या व्यतिरिक्त त्या खेळाडूने त्या त्या खेळाच्या वैयक्तिक अथवा सांघिक क्रिडा स्पर्धामध्ये किमान राज्य अजिंक्य पद स्पर्धांत प्रथम, द्वितीय वा तृतीय स्थान प्राप्त करणे किंवा सुवर्ण, रौप्य वा कास्य पदक प्राप्त करणे आवश्यक असेल. सदर राज्य अजिंक्य पद स्पर्धा या सदर खेळांच्या महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनशी संलग्न असलेल्या अधिकृत राज्य संघटनेने आयोजित केलेल्या असाव्यात अथवा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनने स्वत: आयोजित

केलेल्या असाव्यात. किमान प्राविण्यापेक्षा उच्च स्तरावरील क्रिडा प्राविण्य प्राप्त असलेल्या खेळाडूंना प्राधान्य दिले जाईल. वैयक्तिकरित्या किंवा आमंत्रित स्वरुपाच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेल्या खेळाडूंचा यासाठी विचार केला जाणार नाही. तसेच, राष्ट्रीय छात्रसेनेमध्ये (NCC) अंडर ऑफिसरची रँक मिळवून राष्ट्रीय छात्रसेनेच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदके प्राप्त केलेली व्यक्ती ही अर्ज दाखल करण्यास पात्र असेल.

७) भरतीची कार्यपध्दती व निवडीचे निकष :-

| **वाहन चालन चाचणीस बोलविण्याचे निकष व उत्तीर्ण होण्यासाठी किमान गुण** | **अंतिम निवडीसाठी निकष** |
|---|---|
| अवजड वाहन चालन परवाना प्राप्त झाल्याच्या पृष्ठांकित केलेल्या दिनांकापासूनचा कालावधी या निकषावर १:५ या प्रमाणात पात्र उमेदवारांना वाहन चालन चाचणीस बोलविण्यात येईल. ५० गुणांची वाहन चालन चाचणी घेण्यात येईल. त्यात उत्तीर्ण होण्याकरीता खुल्या प्रवर्गासाठी किमान २५ गुण व राखीव प्रवर्गासाठी किमान २२ १/२ गुण आवश्यक असतील. | वाहन चालन चाचणी प्राप्त गुणांच्या निकषावर तसेच, चाचणीत समान गुण प्राप्त करणा-या उमेदवारांबाबत अवजड वाहन चालन परवाना प्राप्त झाल्याच्या पृष्ठांकित केलेल्या दिनांकापासूनचा कालावधी व तद्नंतर उमेदवाराची वयजेष्ठता या निकष प्राधान्यक्रम आधारे गट निहाय रिक्त जागा व अतिरिक्त २०% प्रतिक्षा यादी संख्ये ऐवढी गुणवत्ता यादी/ प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल. |

अ) गुणवत्ता यादी कालावधी निवड सूची/गुणवत्ता यादी तयार केल्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीकरीता विधीग्राहय असेल. सदर विहित कालावधीनंतर ती गुणवत्ता यादी व्यंपगत होईल.

ब) एका जागेसाठी दोन किंवा अधिक उमेदवारांस समान गुण मिळाल्यास खाली नमूद निकषाच्या प्राधान्यक्रम आधारे गुणवत्ता यादीतील क्रम ठरविण्यात येईल.

i) अवजड वाहन चालन परवाना प्राप्त झाल्याच्या पृष्ठांकित केलेल्या दिनांकापासूनचा कालावधी.

ii) वय (वयाने जेष्ठ असलेल्या उमेदवाराचा क्रम वरचा राहिल)

क) गुणवत्ता यादीतील उमेदवारांना नियुक्तीपूर्वी उपक्रमाच्या वैद्यकीय परीक्षेत उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. वैद्यकीय परीक्षेसाठी पात्र उमेदवारांना वैद्यकीय परीक्षा शुल्क रुपये ५००/- भरणे आवश्यक राहील.

ड) उमेदवारांस (खुल्या प्रवर्गासाठी रुपये २०००/- व राखीव प्रवर्गासाठी रुपये १०००/-) अनामत रक्कम भरणा करुन सहा आठवडयाचे उपक्रमातर्फे देण्यात येणारे वाहन चालन प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणे बंधनकारक राहील.

इ) उमेदवाराची नियुक्ती बदली तत्त्वावर बदली बस चालक म्हणून करण्यात येईल. बदली कालावधी समाप्तीनंतर समाधानकारक काम, वर्तणूक व उपस्थिती, सेवाभिलेख तसेच, जागेच्या उपलब्धतेनुसार व उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्र पडताळणीच्या अधिन राहून कायम स्वरुपी पदावर नियुक्ती केली जाईल.

ई) उमेदवाराने अर्ज दाखल करतांना भरणा केलेले भरती प्रक्रिया शुल्क कोणत्याही कारणास्तव परत केले जाणार नाही.

८) <u>**महत्त्वाच्या सूचना**</u> -

i) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतेवेळी स्वत:चा मोबाईल नंबर व ई-मेल आयडी (असल्यास) देणे आवश्यक आहे.

ii) वाहन चालन चाचणीची तारीख http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द केली जाईल. वाहन चालन चाचणीचे प्रवेशपत्र व चाचणी स्थळ, पत्ता याबाबी वरील नमूद संकेत स्थळावर चाचणीपूर्वी आठ दिवस आधी उपलब्ध करुन देण्यात येतील. प्रवेश पत्राची प्रत स्व:ता उमेदवारानी प्राप्त करुन घ्यावी. त्यासाठी उमेदवारांनी त्यांचा अर्ज क्रमांक संकेत स्थळावर नमूद करुन लॉगऑन केल्यानंतर प्रवेश पत्राची सॉफ्ट कॉपी संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

iii) ऑन लाईन अर्ज करताना शैक्षणिक व इतर प्रमाण पत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, अर्ज परिपूर्णरित्या भरण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावी. अर्ज भरताना त्रुटी राहिल्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही. नियुक्तीपूर्वी देण्यात येणा-या प्रशिक्षण प्रवेशा वेळी उमेदवारांनी शैक्षणिक व इतर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहिल.

iv) उमेदवाराने ऑनलाईन अर्ज दाखल केल्यानंतर सदर अर्जाची प्रिंट काढावी. सदर अर्ज प्रत व चलान भरल्याची प्रत या बाबी वाहन चालन चाचणीच्या वेळेस घेवून येणे बंधनकारक असेल. सदर दोन्ही बाबी तसेच, नूतनीकरण केलेला वाहन चालन परवाना, सार्वजनिक वाहन चालन बिल्ला, वाहन चालन चाचणीकरीता प्रवेश पत्र असल्या शिवाय उमेदवाराची वाहन चालन चाचणी घेतली जाणार नाही. वाहन चालन चाचणी दरम्यान उमेदवारास शारिरीक दुखापत झाल्यास किंवा कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास बेस्ट उपक्रम त्या बाबतीत जबाबदार रहाणार नाही.

v) वाहन चालन चाचणी नंतर तयार करण्यात येणारी गुणवत्ता यादी http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर वाहन चालन चाचणी दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीत जाहीर करण्यात येईल.

vi) वाहन चालन चाचणी दिनांक व वेळ, गुणवत्ता/प्रतिक्षा यादी इत्यादी बाबतची माहिती उपरोक्त नमूद संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध करुन देण्यात येईल. अन्य

कोणताही पत्र व्यवहार केला जाणार नाही. सबब भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी संकेत स्थळाला भेट देवून प्रक्रियेच्या माहितीबाबत अद्य:यावत रहाण्याची जबाबदार उमेदवाराची राहील.

vii) उमेदवाराची वाहन चाचणी ही त्यांने ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्व तपासणी/छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे सदर वाहन चालन चाचणीत प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडी बाबतचे कोणतेही हक्क रहाणार नाहीत. उमेदवाराने अर्जात नमूद केलेल्या पात्रतेनुसार गुणवत्ता यादी/प्रतिक्षा यादी प्रसिध्द केल्यानंतर मूळ कागदपत्रांच्या पूर्ण छाननी नंतरच त्याची निवड निश्चित करण्यात येईल.

viii) शासकीय, निम शासकीय तसेच, शासकीय उपक्रम सेवेतील कर्मचा-यांनी अर्ज दाखल केल्यास अशा अर्जदारास त्यांच्या खात्याचे ना हरकत प्रमाणपत्र प्रशिक्षण प्रवेशावेळी होणा-या कागदपत्र तपासणीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहिल.

ix) उमेदवारांना वाहन चालन चाचणीसाठी नियोजित स्थळी व वेळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. वाहन चालन चाचणीची दिलेली वेळ व तारीख कोणत्याही परिस्थितीत बदलून दिली जाणार नाही.

x) उमेदवाराविरूध्द फौजदारी स्वरूपाचे प्रकरण वा फौजदारी खटला दाखल झालेला असल्यास किंवा प्रलंबित असल्यास असा उमेदवार अर्ज दाखल करण्यास अपात्र असेल त्याचप्रमाणे बेस्ट उपक्रमाचा माजी कर्मचारी असलेला उमेदवारही अर्ज दाखल करण्यास अपात्र असेल.

xi) भरती प्रक्रिये दरम्यान जर एखादया उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविण्यात येईल. तसेच, चुकीच्या व खोटया माहितीच्या कारणास्तव नियुक्ती दिलेल्या उमेदवारांची नियुक्ती रद्द बातल ठरवून त्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता सेवेतून काढून टाकण्यात येईल. तसेच, उमेदवाराने निवडी संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास किंवा अनुचित माध्यमाचा अवलंब केल्यास संबंधित उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे परीक्षेला बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही याची नोंद घ्यावी.

xii) भरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने फक्त गुणवत्तेच्या आधारे पार पडली जाणार असल्याने उमेदवाराने कोणत्याही प्रलोभनास बळी पडू नये.

xiii) शासन निर्णयानुसार जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त नसलेल्या उमेदवारांनी नियुक्ती दिनांकापासून ६ महिन्याच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करणे बंधनकारक असेल. तसेच, ही सर्वस्वी उमेदवाराची स्वत:ची जबाबदारी राहील. अन्यथा त्याची सेवा शासन निर्णया प्रमाणे खंडित करण्यात येईल.

xiv) भरतीसाठी जाहिर करण्यात आलेल्या रिक्त जागांच्या संख्येमध्ये बदल होवू शकतो. निवड झालेल्या उमेदवारांना आवश्यकतेनुसार नियुक्ती देण्यात येईल. भरती प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर स्थगित करणे, रद्द करणे, त्यात अंशत: बदल करणे या संबंधीचे सर्व अधिकार महाव्यवस्थापक, बेस्ट उपक्रम यांस राहतील. याबाबत कोणत्याही उमेदवारास कोणत्याही प्रकारचा वाद उपस्थित करता येणार नाही. भरती प्रक्रिया पूर्ण

होई पर्यंत शासन निर्णयाप्रमाणे बदल करणे आवश्यक ठरल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व ती सर्व उमेदवारांना बंधनकारक राहिल.

xv) सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसुचना क्र.एसआरव्हि.२०००/प्र.क्र. १७/२०१०/१२ दि.२८.०३.२००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्हि. २०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दि. ०१.०७.२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा ( लहान कुटुंबाचे पतिज्ञापन) नियम २००५ अन्वये दि.२८. ०३.२००५ नुसार रोजी हयात असलेल्या व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या या बाबत लहान कुटुंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र प्रमाणपत्र पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच अविवाहित असणा—या उमेदवारानेही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र (लागू नाही असे नमूद करुन) प्रमाणपत्र पडताळणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.

९) अर्ज करावयाची पध्दत-

i) अर्ज फक्त ऑनलाईन अथवा महा-ई-सेवा द्वारे स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

ii) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर संकेत स्थळावर दिनांक १२.११.२०१६ ते दिनांक १३.१२.२०१६ या कालावधीत अर्ज सादर करणे आवश्यक राहिल. ऑन लाईन पध्दतीने अर्ज सादर करताना उमेदवाराने स्वत:चा अद्ययावत फोटो (रुंदी ३ सें.मी. x उंची ४.५ सें.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी (रुंदी ३ सें.मी. x उंची २.५ सें.मी.) आणि ३०० DPI Resolution आणि ५० k.b. पेक्षा कमी साईज होईल अशा विहित पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे. (टिप : फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवारांने त्याचाच फोटो/स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी. प्रवेश पत्रावर/अर्जावर दुस-याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही).

iii) विहित पध्दतीने अर्ज सादर केल्यानंतर विहित मुदतीत भरती प्रक्रिया शुल्क भरल्याशिवाय अर्ज विचारात घेतला जाणार नाही. भरती प्रक्रिया शुल्क भारतीय स्टेट बँक मध्ये चलनाद्वारे, नेट बँकींग द्वारे, डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड किंवा महा-ई-सेवा केंद्राद्वारे भरता येईल.

iv) उमेदवाराने यापूर्वी http://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेत स्थळावर आपले खाते उघडलेले नसल्यास उमेदवारास "नविन वापराकरता नोंदणी" वर क्लिक करुन युझरनेम व पासवर्ड तयार करावा लागेल. त्यानंतर उमेदवारास "प्रोफाईल निर्मिती" मध्ये जावून स्वत:ची संपूर्ण माहिती भरावी लागेल. सदर संकेत स्थळावर यापूर्वी प्रोफाईल निर्मिती मध्ये स्वत:ची माहिती भरलेली असल्यास पुन्हा माहिती

भरण्याची आवश्यकता नाही. परंतु, उमेदवाराने स्वत:ची प्रोफाईल मधील माहिती अद्ययावत करण्याची दक्षता घ्यावी.

v) उमेदवाराने युझरनेम व पासवर्डची नोंद करुन लॉगइन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंकवर क्लिक करावे. त्या कार्यालया अंतर्गत उपलब्ध जाहिराती अर्ज करण्यासाठी 'येथे क्लिक करा' या संदेशासह दाखविल्या जातील. क्लिक केल्यानंतर आपण जाहिरातीत नमूद शैक्षणिक पात्रता, अनुभव, इतर बाबी यांची पूर्तता करत असल्यास आपला अर्ज स्विकारला जाईल. अन्यथा आपला अर्ज दाखल न होण्याचे कारण दर्शविले जाईल.

vi) ज्या उमेदवारांना इंटरनेटद्वारे अर्ज भरावयाचा नसेल त्या उमेदवारांनी महा-ई-सेवा केंद्रामार्फत आपला अर्ज भरावा त्याचवेळी उमेदवाराकडून भरती प्रक्रिया शुल्क स्विकारले जाईल व त्याची पावती देण्यात येईल. छायाचित्र, स्वाक्षरी स्कॅन व अर्ज प्रत मिळण्याकरीता मात्र केंद्र चालक स्वतंत्र रक्कम आकारतील.

vii) भरती प्रक्रिया शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवारांनी युझरनेम / पासवर्ड नोंद करुन लॉगईन करावे. लॉगईन झाल्यानंतर मुखपृष्ठाच्या वरील भागातील "माझे खाते" या लिंकवर क्लिक करावे. उजवी कडील असलेल्या पर्यायांपैकी "थेट भरती" हा पर्याय निवडून उमेदवाराने अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडावे. तसे केल्यानंतर उमेदवाराने अर्ज केलेले पद शुल्क भरल्याच्या/न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. पदासमोर ("unpaid") असे लिहिलेले असेल त्या ठिकाणी Pay Now अशी लिंक उपलब्ध असेल. "Pay Now" या लिंकवर क्लिक केल्यानंतर तीन पर्याय उपलब्ध होतील. १) ऑन लाईन पेमेंट, २) महा-ई-सेवा केंद्र, ३) चलनद्वारे.

viii) उमेदवार क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड अथवा नेट बँकींगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील महा-ई-सेवा केंद्र हा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या पावतीची प्रत घेवून महा-ई-सेवा केंद्रात जावून शुल्काचा भरणा केला जावू शकतो. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करणे आवश्यक आहे. उमेदवाराने चलनद्वारे हा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणा-या चलनाची प्रत घेवून भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केला जावू शकतो. ज्या उमेदवाराने भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे शुल्क भरणा करावयाचा आहे असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या दोन तासानंतर अथवा शेवटच्या दिवशी अर्ज सादर करणा-या उमेदवारांनी त्यापुढील कामकाजाच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन वेळेत परीक्षा शुल्क भरणे आवश्यक असेल. चलनाद्वारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवारांकडून भरती प्रक्रिया शुल्का व्यतिरिक्त रुपये ५०/- बँकेचे सेवा शुल्क म्हणून आकारेल.

ix) अर्ज भरण्यासंबंधी तसेच वाहन चालन चाचणीचे हॉल टिकीट (परिक्षा प्रवेशपत्र) उपलब्धतेसह इतर तत्सम बाबींसाठी http://maharecruitment.mahaonline.gov.in;

या संकेत स्थळावर संपर्क करावा. त्याचप्रमाणे अर्ज भरण्यास काही अडचण असल्यास 022/61316403 या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

x) विहित पध्दतीने अर्ज सादर करुन शुल्क भरण्याची कार्यवाही तसेच, भारतीय स्टेट बँकेमध्ये चलनाद्वारे भरती प्रक्रिया शुल्क भरावयाचे झाल्यास चलनाची प्रत घेण्याची कार्यवाही दिनांक १३.१२.२०१६ रोजी २३.५९ वाजेपर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानंतर सदर वेबलिंक बंद होईल.

xi) चलनाद्वारे परीक्षा शुल्क भरावयाचे असल्यास भारतीय स्टेट बँकेमध्ये दिनांक १३.११.२०१६ ते दिनांक १४.१२.२०१६ पर्यंत बँकेच्या कार्यालयीन वेळेत याचा भरणा करणे बंधनकारक असेल. विहित दिनांकानंतर भरती प्रक्रिया शुल्क भरल्यास ते वैध मानले जाणार नाही. तसेच, त्या भरणा प्रक्रिया शुल्काचा परतावाही केला जाणार नाही.

ठिकाण मुंबई
दिनांक :

महाव्यवस्थापक
बेस्ट उपक्रम

## <u>महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबांचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील</u>

## <u>प्रतिज्ञापनाचा नमुना –अ</u>

## <u>प्रतिज्ञापन</u>

### नमुना–अ

### ( नियम ४ पहा )

मी श्री.______________________________ श्री. ____________

______________________________यांचा/मुलगा, वय _____ वर्षे, राहाणार,

__________________________________________________

__________________________________________________

___

याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो की,

(१) मी ________________ पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

(२) आज रोजी मला ____________ ( संख्या ) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या __________ आहे. ( असल्यास, जन्मदिनांक नमूद करावा.)

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- सही/—